**मंजुर पोटनियम ३७फ(१.९) सभासद कल्याण निधी दि.०१.०८.२०१८**

संस्था सभासदांचे कल्याणासाठी सभासद कल्याण निधी या नावाने फंड उभारील.त्या प्रमाणे प्रत्येक सभासदास परत न मिळणारी नॉन रिफंडेबल अशी रू.१२००/- मात्र वर्गणी अर्थिक वर्षात एकदा सभासद कल्याण निधीत जमा करील तसेच पोटनियम नं.ग.१.१ प्रमाणे वार्षिक नफ्यातुन सदर फंडात वर्ग होणारी रक्कम **सदर फंडातुन खालील प्रमाणे कार्य केले जाईल.**

१. सभासदांचे हुशार मुला/ मुलीना शैक्षणिक प्रोत्सहानपर बक्षीस देणे.

२.मयत सभासदांना त्यांच्याकडे असलेल्या कर्जापोटी (शेअर्स व कायमनिधी वजा जाता)संपुर्ण कर्ज माफ केले जाईल. सदर योजनेचा फायदा पोटनियम मंजुरीनंतर कार्यान्वित होईल.

३.सर्व सभासदांचे ग्रुप जनता अपघात विमा उतरविणे व त्यांचा वार्षिक हप्ता सदर निधीमधुन भरणे.

४. तसेच मयत सभासदांचे वारसांना सानुग्रह तातडीची मदत रू.५000/- पर्यंत देणे.

५. सभासदांच्या कल्याणासाठी आवश्यक ती कल्याणकारी योजना राबविणे.

६.सभासद कोणत्याही कारणाने मयत झाल्यास त्याचे कायदेशीर वारसास रूपये २.00 लाख आर्थिक मदत देण्यात येईल.

७. सभासदांचे फक्त मुलींचे विवाहसाठी संस्थे मार्फत धनादेशव्दारे रू.५000/- कन्यादान म्हणुन लाभ देण्यात येईल.

८.मयत झालेल्या सभासदाने मयतपूर्वी या योजनेत नियमित पगारातून रक्कम कपात करणे आवश्यक आहे.

९.ही योजना माजी सभासदांना अथवा सेवानिवृत्त सभासदांना लागू असणार नाही.

१0.वारसाने मदत मिळणेसाठी सभासदांचा मृत्यूचा दाखला व सक्षम अधिका-यांने दिलेले वारस दाखला जोडून संस्थेकडे लेखी अर्ज केला पाहीजे.

११.गरज वाटल्यास संस्था सक्सेशन सर्टफिकेट मागू शकते ते देण्याचे वारसावर बंधन राहील.

१२.वारस एका पेक्षा जास्त असतील व एकाच वारसांस रक्कम देण्याची मागणी असेल तर तसे सर्व वारसांनी लेखी संमतीपत्र सक्षम अधिका-यासमोर करून दिले पाहीजे.

१३.वारस एकापेक्षा जास्त असतील व त्यांनी सर्वानी मदत मिळणेसाठी मागणी केल्यास मदत विभागून देण्यात येईल.अशा वेळी अथवा वादाचेवेळी मयत सभासदाची पती/पत्नी जीवंत असतील तर इतर वारसाचा विचार न करता पती/पत्नी याच वारसास मदत देण्यात येईल .

१४.वारस अज्ञान असल्यास त्या वारसाचे पालकत्व घेतलेली व्यक्ती अर्ज करू शकते.

१५.वारस अज्ञान असल्यास त्याचे संगोपनासाठी व विकासाठी सदर रकमेचा विनियोग केला जाईल असे सक्षम अधिका-यासमोर हमीपत्र संबंधीत मागणी करणाया वारसाने/ पालकत्व घेतलेल्या व्यक्तीने करून देणे बंधनकारक राहील.

१६.निधी अपुरा असल्यास व मदत देणे पेंडीग असल्यास अशा वेळी आलेल्या अर्जाचे तारखे नुसार प्रतिक्षा यादी तयार करण्यात येईल.प्रतिक्षा यादी त्याप्रमाणे निधी उपलब्ध झाल्यानंतर मदत अदा केली जाईल.

१७.प्रतिक्षा यादी तयार करताना संपुर्ण पुर्तता झालेल्या अर्जाचाच विचार केला जाईल.तसेच मयत सभासदाचे वारसामध्ये कोणी कमावते नसेल तर त्यांना प्राधान्य देण्यात येईल.

१८.सदर नियमात बदल करण्याचे अथवा वाढ करण्याचे अधिकार संचालक मंडळास राहतील.

१९.सभासदाकडून घ्यावयाच्या दरमहा रकमेमध्ये वाढ करण्याचे अधिकार संचालक मंडळास राहतील.मात्र अशा बदलास पुढे येणारे सर्वसाधारण सभेत मान्यता घ्यावी लागेल.